# ANAMPREM NEWSLETTER

# अनामप्रेम स्नेहवार्ता

OCTOBER 2025

WWW.ANAMPREM.ORG

मासिक पत्रिका - ऑक्टोबर 2025



दानक सत्य - निर्भीड - निष्पक्ष लोकशक्ती न्यूज २४

अहिल्यानगर, शुक्रवार, ३ ऑक्टोबर २०२५


## दिव्यांग जीवन परिवर्तनासाठी अनामप्रेम संस्थेचा स्तुत्य उपक्रम

## विजया दशमीच्या शुभदिनी लाडजळगावात किराणा किट वाटप सोहळा

लोकशक्ती न्यूज नेटवर्क

बोधेगाव प्रतिनिधी /प्रमोद कातकडे

विजय,ऐक्य आणि सामाजिक बांधिलकी यांचे प्रतीक असलेल्या विजया दशमीच्या मंगलदिनी अनामप्रेम अहिल्यानगर या सामाजिक संस्थेमार्फत दिव्यांग बांधवांसाठी विशेष किराणा किट वाटपाचा उपक्रम २ ऑक्टोबर २०२५ रोजी लाडजळगाव तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडला.दिव्यांग बांधवांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविणे व त्यांना आधार देण्याचा संकल्प या उपक्रमातून प्रत्यक्ष दिसून आला. मान्यवरांच्या हस्ते हा वितरण सोहळा पार पडला.या उपक्रमाचे वितरण लाडजळगाव ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच श्री. अंबादासजी ढाकणे व सेवा सोसायटीचे माजी चेअरमन श्री.केदार पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी लाभार्थींसोबत गावातील समस्त ग्रामस्थ,तरुण मंडळी तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निमित्ताने सामाजिक बांधिलकीचा संदेश गावामध्ये गेला.



कार्यक्रमाच्या प्रसंगी मान्यवरांनी समाजातील वंचित घटकांबाबत संवेदनशीलता आणि बांधिलकी जोपासण्याची गरज अधोरेखित केली. "दिव्यां बांधवांना आधार देणे म्हणजे त्यांच्या जगण्यात नवचैतन्य निर्माण करणे होय. स्वावलंबन आ आत्मविश्वासाच्या वाटचालीत समाजाने खांद्याला खांदा लावून उभे राहिले पाहिजे,"असे विचार वेळी व्यक्त करण्यात आले. अनामप्रेम संस्थेने राबविलेला हा उपक्रम केवळ दिव्यांग बांधवांसा मदतीपुरता मर्यादित न राहता समाजातील इतर घटकांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे.गावाती तरुणाईनेही मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.संस्थेच्या प्रयत्नांमुळे "दिव्यां जीवन परिवर्तन" या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ मिळाले असून हा आदर्श उपक्रम इतर गावांसा दिशादर्शक ठरेल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.


















नवा मराठा

epaper.enavamaratha.com
16 Oct 2025 - Page 5




प्रदुषण मुक्त दिवाळीतून मदतीचा संदेश देणारे अरणगाव मधील संस्कार अकॅडमीचे चिमुकले विद्यार्थी.

## अरणगावमधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी प्रदूषणमुक्त दिवाळीतून दिला मदतीचा संदेश

नगर – अरणगाव, मेहराबाद येथील संस्कार अकॅडमीच्या संस्कार क्लासेस व प्ले ग्रुप व नर्सरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत अनाम प्रेम या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध फराळाचे पदार्थ, शैक्षणिक साहित्य ड्रेस इत्यादी वस्तू भेट दिली. यानिमित्ताने अनाम प्रेम संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक त्याचप्रमाणे अनाम प्रेम संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सर्वांचे स्वागत व आभार संचालिका सौ. प्राध्यापिका अमृता अमोल देवकर यांनी मानले.

- **प्रदूषणमुक्त दिवाळीचा सुंदर संदेश देत अरणगाव येथील संस्कार अकॅडमीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग मुलांना फराळ, किराणा किट, शैक्षणिक साहित्य व ड्रेसचे वाटप करून आनंदाचा दीप प्रज्वलित केला.**

- विजयादशमी निमित्त सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात पारंपरिक पद्धतीने सर्व विभागातील वस्तू, मशिनरी, टूल्स व वाहनांचे पूजन करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने, सौ. अनिता माने, श्री. दीपक देशपांडे तसेच सर्व कार्यकर्ते, विद्यार्थी व लाभार्थी उपस्थित होते.




Scanned with OKEN Scanner









# पूरग्रस्त दिव्यांग बांधवांसाठी अनामप्रेम संस्थेचा मदतीचा हात

मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पुरस्थितीत अनामप्रेम परिवाराने मानवतेचा सुंदर आदर्श घालून दिला आहे. नगर जिल्ह्यातील शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील पूरग्रस्त दिव्यांग बांधवांना घरपोच किराणा किट, आवश्यक साहित्य आणि मानसिक आधार देऊन त्यांच्यापर्यंत आशेचा किरण पोहोचवला.



























**स्नेहालय परिवार आयोजित विशेष शासकीय सेवा कॅम्पद्वारे संजय गांधी निराधार, रेशन कार्ड व आधार अपडेट या योजना लाभार्थ्यांपर्यंत यशस्वीपणे पोहोचविण्यात आल्या. या उपक्रमात अनामप्रेम परिवारातील १४ विद्यार्थ्यांचे आधार अपडेट व २ लाभार्थ्यांना नवीन रेशन कार्ड मिळाले.**



**SBI MIDC शाखेच्या मा. निलीमा मॅडम व नागेश गिते सर यांच्या पुढाकाराने अनामप्रेम परिवारातील दिव्यांग विद्यार्थी व कार्यकर्त्यांसाठी विशेष बँक खाते उघडणी कॅम्प आयोजित करण्यात आला.**

**या उपक्रमामुळे अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांचे सेव्हिंग खाते उघडून त्यांना आर्थिक स्वावलंबनाचा नवा मार्ग मिळाला.**

Scanned with OKEN Scanner








## सामाजिक बांधिलकी जपत – आनंद पार्श्व प्री-स्कूलची दिवाळी अनामप्रेम संस्थेसोबत

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आनंद पार्श्व प्री-प्रायमरी स्कूलच्या शिक्षक व चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अनामप्रेम - हिंमतभवन वसतिगृहातील दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत दिवाळी साजरी करून आनंद आणि ममतेचा सुंदर संदेश दिला.

संगीत, हसरे चेहरे आणि आत्मीय संवाद यांमुळे दिवाळीचा हा क्षण खऱ्या अर्थाने प्रकाशोत्सव ठरला.

सामाजिक संवेदनशीलता आणि आपुलकीचा सुवास पसरवणारा अनोखा उपक्रम.!



हंगा येथे आयोजित राज्यस्तरीय दिव्यांग वधू-वर परिचय मेळाव्यात अनामप्रेम परिवाराचे श्री. प्रवीण नवले यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली, तर YouT 4 Job टीमने रोजगार प्रशिक्षणाच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.




**Green Apple Schoolचा सुंदर उपक्रम**

**दिवाळीच्या आनंदात सहभाग घेत Green Apple Schoolच्या शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग मुलांना किराणा, दिवाळी किट व फराळ देत आनंद वाटला. माणुसकीचा आणि आनंदाचा खरा उत्सव यावेळी साजरा झाला.**



**दीपावलीच्या मंगलमय पार्श्वभूमीवर श्री. संकेत देशपांडे सर यांनी अनामप्रेम पुणे प्रकल्पातील सर्व विद्यार्थ्यांना झब्ब्याच्या कापडाचे वाटप करून आनंदाचा सुंदर प्रकाश पसरवला. त्यांच्या या उदार आणि मन:पूर्वक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.**



Scanned with OKEN Scanner




## अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात मासिक आढावा बैठक संपन्न

अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात झालेल्या मासिक आढावा बैठकीत संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने सर, श्री. अनिल गावडे सर, सौ. अनिता माने मॅडम व श्री. अभय रायकवाड सर यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व विभाग प्रमुख व कार्यकर्त्यांनी महिन्याचे काम सादर केले.

या बैठकीत प्रकल्प प्रगती, अडचणी व आगामी नियोजनावर सविस्तर चर्चा झाली.
अजित माने सरांनी शिस्त, पारदर्शकता आणि लोकहितासाठी निष्ठेने काम करण्याचे मार्गदर्शन केले, तर अनिल सरांनी सादरीकरण, उद्दिष्टपूर्ती आणि सकारात्मक वर्तनाचे महत्त्व अधोरेखित केले.



अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पातील विद्यार्थ्यांना आणि कार्यकर्त्यांना श्री. गोविंद कुलकर्णी यांनी दीपावलीनिमित्त नवीन शर्ट भेट दिले.



## माणुसकी फाउंडेशनचा “दान उत्सव 4.0" अनामप्रेमला उत्स्फूर्त प्रतिसाद

माणुसकी फाउंडेशन यांच्या पुढाकाराने आयोजित “दान उत्सव 4.0” यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमाला अनामप्रेम संस्थेकडून उत्साही प्रतिसाद दिला गेला. अनेक मान्यवरांनी भेट देऊन संस्थेच्या कार्याचे कौतुक केले आहे.

उद्घाटन प्रसंगी बागला ग्रुपचे CMD श्री. ऋषी बागला आणि एन्ड्रेस हाउसेरच्या व्हाइस प्रेसिडेंट (फायनान्स) श्रीमती भारतीया यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. या निमित्ताने संस्थेला दोन्ही प्रतिष्ठित उद्योगसमूहांशी संवाद साधण्याची आणि CSR सहकार्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे.




“नवजीवन” संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती गांधी यांची अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पास सदिच्छा भेट

शहरातील ४१ वर्षांपासून मतीमंद दिव्यांगांसाठी कार्यरत नवजीवन संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती गांधी यांनी आरंभ व स्पंदन 2.0च्या आयोजक श्रीमती अंबिका टाकळकर यांच्यासह अनामप्रेमला भेट दिली.



Scanned with OKEN Scanner




## गौरांग शाळेत जागतिक अंध दिन साजरा

दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी साजरा होणारा जागतिक अंध दिन (WORLD WHITE CANE SAFETY DAY) म्हणजे दृष्टिहीन व्यक्तींच्या स्वावलंबन, हक्क आणि समाजातील समावेश यांचा गौरव करण्याचा दिवस. या निमित्ताने गौरांग शाळेत आजचा दिवस उत्साह, आनंद आणि सामाजिक संदेशांनी भरलेला ठरला.

शाळेतील विशेष मुलांनी विविध घोषणांद्वारे आणि फलकांद्वारे “दृष्टिहीनांप्रती आदर आणि संवेदना” यांचा संदेश देत रॅली काढली. रॅलीदरम्यान मुलांचा आत्मविश्वास, उत्साह आणि आनंद सर्वांच्या मनाला स्पर्शून गेला.

या कार्यक्रमाच्या यशामागे शिक्षक श्री. रामु सर, श्री. राजु सर, कोतकर मॅडम आणि सर्व कार्यकर्त्यांचे विशेष योगदान राहिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मुलांना या दिवसाचे महत्व समजून घेता आले आणि समाजात जागरूकतेचा सुंदर संदेश पोहोचवता आला.



## अनामप्रेम हिम्मतभवन वस्तीगृहात लक्ष्मीपूजन सोहळा संपन्न

आज अनामप्रेम हिम्मतभवन वस्तीगृहात लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने संपन्न झाला.
पूजनाचे सौभाग्य डॉ. मेघना मराठे मॅडम, श्री. विजय घोलप सर आणि श्री. अभय रायकवाड सर यांच्या हस्ते पार पडले.

या प्रसंगी संस्थेचे सर्व कार्यकर्ते एकत्र येऊन देवी लक्ष्मीचे पूजन करत समृद्धी, आनंद आणि शुभशांतीसाठी प्रार्थना केली.
भक्तिभावाने भरलेले वातावरण आणि सर्वांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे हा क्षण विशेष आणि प्रेरणादायी ठरला.



Scanned with OKEN Scanner



जनप्रवास

# स्नेहधारा फाउंडेशनच्या वतीने अनाम प्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांना दिवाळीची भेट

## अनाम प्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांना मॉर्निंग किटची भेट देत स्नेहधारा फाउंडेशनकडून दिवाळीची सुरुवात - भुपेंद्र रासने

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : अंध,अपंग आणि मूकबधिर विद्यार्थ्यांकडून एक रुपया ही न घेता आणि सरकारी अनुदान ही न घेता अश्या शेकडो विद्यार्थ्यांना जीवनात त्यांच्या पायावर सक्षमपणे उभी करणारी एक अतिशय महत्त्वाची आणि नावाजलेली संस्था म्हणजे अनाम प्रेम संस्था आहे. आज घडीला अनाम प्रेम मध्ये जवळजवळ शंभर अंध, दिव्यांग किंवा मुक बधीर विद्यार्थी निवासी राहून आपले शाळा, महाविद्यालयीन शिक्षण, कौशल्य शिक्षण, कला ,क्रीडा , तंत्रज्ञान इतकेच नव्हे तर स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. अनेकांनी आपल्या अंगी असलेल्या कला गुणांनी विविध स्पर्धांमध्ये यश मिळवत आहेत. तसेच खेळामध्येही अनेक विद्यार्थी यशस्वी होत आहे. काही विद्यार्थी बँक, रेल्वे पासून तर फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया सारख्या सरकारी आस्थापनांमध्ये चांगल्या पदावर नोकरीला ही लागले आहेत. हम भी किसी से कम नही हे जगाला दाखवून दिले आहे, या अनाम प्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांना मॉर्निंग किटची भेट देत स्नेहधारा फाउंडेशनकडून दिवाळीची सुरुवात करण्यात आली असे प्रतिपादन भुपेंद्र रासने यांनी केले.

अनाम प्रेम संस्थेला स्नेह भेट देण्याच्या निमित्ताने स्नेहधारा फाउंडेशनच्या वतीने अनाम प्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त मॉर्निंग किटची भेट देण्यात आली. यावेळी स्नेहधारा फाऊंडेशनचे अध्यक्ष भूपेंद्र रासने, सौ. पुनम रासने, नारायण मंगलारम, विद्या मंगलारम, वासंती तिरमल,संकेत होशिंग, क्षितिजा होशिंग,वैशाली राजहंस, क्षितिजा हडप, कौस्तुभ देशपांडे, सोनाली देशपांडे, उमेश झोटिंग, स्नेहधारा फाऊंडेशनचे पदाधिकारी तसेच अनाम प्रेम संस्थेचे पदाधिकारी विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

13 Oct 2025 - Page 3 | epaper.janpravaslive.in



**अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पातील रस्त्याच्या निधी मंजुरीसंदर्भात जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंद भंडारी सर यांची अनामप्रेम संस्थेच्या विश्वस्तांशी भेट घेऊन रस्ता मंजुरी व निधीबाबत चर्चा करण्यात आली.**

**या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने, उपाध्यक्ष डॉ. बापू कांडेकर, डॉ.गिरीश कुलकर्णी व श्री. अनिल गावडे यांच्यासह संस्थेतील कार्यकर्ते उपस्थित होते.**








**अनामप्रेम संस्थेच्या कौशल्य विकास केंद्रा अंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मेहनतीने व आत्मविश्वासाने तयार केलेली विविध उत्पादने आता नगर,पुणे छ.संभाजीनगर ठिकाणी प्रदर्शित व विक्रीसाठी लावण्यात येत आहेत.**



**दसरा सणाच्या शुभप्रसंगी, अनामप्रेम आधारग्राम प्रकल्पात स्पाइनल कॉर्ड इंजुरी पेशंटसाठी असलेल्या व्यायाम मशिनरीचे व प्रकल्पाचे पूजन संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने सर व सौ. अनिता माने मॅडम यांच्या हस्ते संपन्न झाले.**



Scanned with OKEN Scanner




**आरंभ संस्थेच्या स्पंदन 2.0 या दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्री-प्रदर्शनात अनामप्रेम संस्थेच्या स्टॉलला छ.संभाजीनगर येथील जिल्हाधिकारी मा. दिलीप स्वामी सर यांनी भेट देऊन मुलांनी बनविलेल्या वस्तूंची माहिती जाणून घेतली.**









**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त गौरांग शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या शिक्षणतत्त्वांचा सन्मान करण्यात आला.**





**अनेक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार, प्रत्येक अमावस्येला 'गुजराती भोजनालय' यांच्यामार्फत संस्थेतील सर्व दिव्यांग मुलांना स्नेहभोजन देण्यात येते. यावेळीही प्रेम आणि आपुलकीने हे विशेष भोजन मुलांनी मनसोक्त आस्वादून आनंद द्विगुणित केला.**







**दीपावलीच्या मंगल प्रसंगी, अनामप्रेम परिवारामार्फत सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना नवीन ड्रेस तसेच किराणा व फराळ वाटप करण्यात आले.**

**या उपक्रमामुळे मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य आणि उत्साह हीच खरी दिवाळी ठरली.**



Scanned with OKEN Scanner




**इंटरनॅशनल पर्पल फेस्ट – गोवा 2025 अंतर्गत झालेल्या व्हीलचेअर T20 क्रिकेट चॅम्पियनशिप मध्ये अनामप्रेम स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटर येथील खेळाडू गणेश अण्णासाहेब बावस्कर यांनी महाराष्ट्र संघाकडून उत्कृष्ट कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.**

**ओडिशा संघाविरुद्धच्या सामन्यात 53 धावा व 2 बळी घेऊन “सामनावीर” हा किताब पटकावणाऱ्या गणेशने आपल्या जिद्दी, मेहनती आणि कौशल्याच्या जोरावर दिव्यांग खेळाडू म्हणून नाव उंचावले.**



**अनामप्रेम गौरंग अभिनव शाळेत कार्यानुभव उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक कलाकृतींची निर्मिती केली. सर्जनशीलता, कौशल्य विकास आणि आत्मविश्वास वाढवणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी गती देणारा ठरला.**





**अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थी, लाभार्थी व कार्यकर्त्यांच्या एकत्र सहभागातून श्रमदान उपक्रम राबवून परिसराची स्वच्छता करण्यात आली. सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि स्वच्छतेबाबतची जागरूकता वाढवणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.**

Scanned with OKEN Scanner

स्थापना 2005
अनामप्रेम

# अनामप्रेम – आधारग्राम

## यशवंत प्रकल्प स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटर

**OCTOBER - 2025**







**अनामप्रेम यशवंत प्रकल्प - स्पायनल कॉर्ड इंजुरी पुनर्वसन केंद्रात उपचार घेत असलेले पेशंट.**

**सप्टेंबर महिन्यात Y4J प्रशिक्षण केंद्रामार्फत एकूण 12 दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून पुणे, बारामती आणि छत्रपती संभाजीनगर येथे रोजगार मिळवला आहे.**
**ही कामगिरी अनामप्रेम परिवाराच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीची प्रेरणादायी साक्ष आहे.**








Scanned with OKEN Scanner

# SUNIL KAKA



## हजार हात असलेला विश्वकर्मा सुनील गंगाराम कांबळे

“कलेचे कर आणि सेवाभावाचे मन — हाच आहे सुनील काकांचा खरा परिचय.”

२५ मे १९७० रोजी सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण तालुक्यातील कुंभारी या छोट्याशा गावात सुनील गंगाराम कांबळे यांचा जन्म झाला. त्यांना अजून दोन बहिणी व दोन भाऊ होते. साध्या कुटुंबात जन्मलेले सुनील काका लहानपणापासूनच कष्टाळू आणि स्वप्नाळू होते. त्यांच्या आई भामाबाई पायामध्ये अपंग होत्या. तरीसुद्धा त्या घरकाम करुन सर्व मुलांचा सांभाळ आनंदात करत होत्या. वडील मोजणी खात्यात सरकारी नोकरी करत होते. अतिशय प्रेरणादायी वातावरणात सुनील यांच बालपण गेलं. सुनील काकांमध्ये बालपणापासूनच एकप्रकारचं वेगळेपण होतं.

शिक्षण आणि प्रारंभिक काळ-

सुनील काकांनी आपलं शिक्षण कुंभारी आणि सोलापूर येथे पूर्ण केलं. पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण सरस्वती प्राथमिक विद्यालय आणि पाचवी ते सातवी पर्यंत श्री गणेश सिद्ध हायस्कूल, कुंभारी येथे तर आठवी ते दहावी पर्यंत मॉर्डन हायस्कूल, सोलापूर येथे पूर्ण केले. शाळेत नेहमी शांत पण हातात नेहमी काहीतरी बनवायचे साधन असा त्यांचा स्थायीभाव होता. खेळण्यातही काहीतरी घडवायचं, जोडायचं, दुरुस्त करायचं ही सवय त्यांना होती. शिक्षक म्हणायचे की हा मुलगा नक्कीच एक हरहुन्नरी कलाकारच होणार आहे. आणि ते खरंच झालं.

दहावी नंतर त्यांनी सोलापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) कारपेंटर कोर्स पूर्ण केला. सुतारकामामध्ये प्राविण्य मिळवणे हेच त्यांचे ध्येय होते. ते ध्येय साध्य करण्यासाठी ते अतोनात प्रयत्न करत असत. "कलेला सीमा नसते आणि कष्टांना पर्याय नसतो" हे ब्रीदवाक्य त्यांच्या मनामध्ये होते. हा कोर्स पूर्ण करत असतांना त्यांनी हत्यारांशीच प्रेम प्रकरण सुरु केलं. प्रत्येक लाकडाच्या तुकड्यात त्यांनी जीव ओतला आणि त्यातुन त्यांनी नानाविध आकारात अनेक कलाविष्कार साकारत स्वप्न प्रत्यक्षात घडवलं व ते एक आदर्श कलाकार बनुन त्या संस्थेतून बाहेर पडले.

कौटुंबिक जीवन-

सुनील यांचा विवाह श्री. सिद्धराम वाघमारे यांच्या कन्या विजयालक्ष्मी यांच्याशी झाला. दोन मुलं आणि दोन मुलींसह त्यांचा संसार आनंदात सुरु होता. परंतु त्यांच्या मनामध्ये असलेली कलेची ज्वाला त्यांना शांत बसू देत नव्हती. "इतरांपेक्षा आपण काहीतरी वेगळं करायचं !" ही जिद्द त्यांच्या मनामध्ये होती. आई-वडिलांना शेतीची गोडी होती पण सुनील यांना कलेची शेती करायची होती. त्यांना सुतार कामाचा छंद जोपासायचा होता, "लाकडात रममाण व्हायचं होतं, रंगात आणि आकारात हरवायचं होतं." मनाचा आवाज त्यांनी ऐकला आणि जगात नवी ओळख निर्माण करण्यासाठी त्यांनी गृहत्याग करण्याची मनाशी खुणगाठ बांधली. त्यावेळी त्यांनी मनाशी एकच ठरवलं होतं -"घरासाठी काम केलं तर पोट भरेल, पण मनासाठी काम केलं तर जीवन समृद्ध होईल." याच विचारांनी त्यांनी आपलं गाव, घर आणि स्थैर्य मागे टाकत सुरुवात केली ती असंख्य संघर्षाच्या यात्रेला..

म्हणतात ना,
जो फैसले जिंदगी मे मुश्किल होते है,
वही जिंदगी के बेहतरीन फैसले होते है...!

याप्रमाणे सुनील काकांनी “बेहतरीन” होण्यासाठी मार्गाक्रमण सुरु केले.


Scanned with OKEN Scanner

सुनील कलाकाराचा अंगभूत कला विकसित करण्यासाठी प्रवास-

सोलापूरमध्ये काही दिवस काम करुन त्यांनी पुणे गाठले. तिथे कालिदास गुंजाळ यांच्या फर्निचर दुकानात जवळपास सात वर्षे काम केले. हातात आरी, मनात उत्साह आणि चेहऱ्यावर समाधान यामुळे त्यांचे काम खूप उत्कृष्ट असायचे. अजून काहीतरी नवीन करावे म्हणुन त्यांनी पुणे सोडून अहिल्यानगरच्या (पूर्वीचे अहमदनगर) तारकपूर येथे अरुण गायकवाड यांच्या फर्निचर दुकानात जवळजवळ त्यांनी सात वर्षे काम केले. "ते फक्त फर्निचर बनवत नव्हते तर ते स्वप्न घडवत होते, हृदयस्पर्शी आकार देत होते आणि सौंदर्याची भाषा लिहीत होते." त्यांनी संपूर्ण नगर जिल्ह्यात आपली स्वत:ची एक वेगळीच ओळख निर्माण केली, ती म्हणजे 'हातात जादू असलेला कारागीर- सुनील गंगाराम कांबळे.' त्यांच्या हातातील कलाकुसर आणि कामातील प्रामाणिकपणा यामुळे सुनील काका हे नाव गुणवत्तेचं प्रतिक बनलं. ते फक्त कारागीरच नव्हे तर ते नाविन्याचे शिल्पकार बनले होते. ही सर्व ओळख निर्माण करत असताना त्यांच्या हातामध्ये फक्त दोन चाकांची सायकल होती.

सामाजिक प्रवास – स्नेहालय ते अनामप्रेम

2005 मध्ये त्यांच्या आयुष्याने एक नवीन वळण घेतलं आणि त्यांना त्यांच्या सायकलने नेले ते स्नेहालय या सामाजिक संस्थेकडे. स्नेहालयमध्ये काम करताना ते संस्थेशी मनापासून जोडले गेले. तिथे त्यांनी अनेक प्रकारची कामे केली ज्यात सुतारकाम, प्लंबिंगची कामे, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तु बनविणे. येथेच त्यांनी "लाकडाच्या ओंडक्यांमध्ये भावना कोरल्या, आरीच्या आवाजात संगीत ऐकलं." लोकांना त्यांनी बनविलेल्या वस्तु तर आवडल्याच पण काकांबद्दल देखील आदर वाटू लागला. २००८ मध्ये स्नेहालयच्या "प्रतिसाद" केंद्राच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. याच दरम्यान त्यांची अनामप्रेम संस्थेशी जवळीक वाढली.

काकांचे कलेतील अष्टपैलुत्व

२०१४ पासून ते अनामप्रेमचे निवासी सदस्य झाले. अनामप्रेममधील सर्वजण त्यांना प्रेमाने "सुनील काका" म्हणून संबोधतात. येथे त्यांच्यातील कलाकाराला एक नवीन आयाम मिळाला. त्यांनी संस्थेतील मेंटेनन्स विभाग, दुरुस्ती, बांधकाम, सुतारकाम, इलेक्ट्रॉनिक काम, लोहारकाम, पेंटिंग, प्लंबिंग, वाहन दुरुस्ती अशा असंख्य क्षेत्रात आपली कला उजळवली. त्या दिवसापासून अनामप्रेम मधील प्रत्येक कोपरा, फर्निचर, वास्तूतील असंख्य कामे त्यांच्या श्रमाने आणि प्रेमाने जिवंत झाली आहेत. एकाच माणसाच्या हातात इतकी विविधता आहे हे पाहून सगळे थक्क होतात. "एक व्यक्ती आणि हजार हात" याप्रमाणेच त्यांचे काम आहे. त्यांच्या हाताच्या स्पर्शाने भंगाराचं सोनं होतं आणि तुटलेलं उजळून नवजीवन घेतं. काकांनी संस्थेतील प्रत्येक वस्तू आपल्या हातांच्या स्पर्शाने उपयोगी आणि सुंदर बनवली. सुनील काकांसारखा सर्वगुणसंपन्न कलाकार संस्थेत असणे म्हणजे खरंच अनमोल गोष्ट आहे. त्यांचे आयुष्य म्हणजे- अनुभवसंपन्न जिवंत कार्यशाळा असुन कष्ट, कला आणि करुणा यांची शिदोरी आहे.

कलेसोबत सेवाभाव

सुनील काका फक्त कलावंतच नाहीत, तर ते सेवेकरी देखील आहेत.
दिव्यांग, प्राणीमात्र आणि गरजू लोकांची सेवा करणं, तुटलेलं जोडणं, आणि प्रत्येक काम मनापासून करणं हाच त्यांचा खरा धर्म आहे. कलेचा हात, कष्टाची वाट आणि सेवाभावाची साथ या तिन्हींच्या संगमातून सुनील काकांची प्रतिमा तयार होते.

काका खूप मेहनतीने, मनापासून काम करतात. तुटलेली खुर्ची दुरुस्त करताना ते त्या खुर्चीत बसलेल्या माणसाचं मन ही दुरुस्त करतात. त्यांच्या हातात केवळ अवजार नाही, तर उब देणारे, जोडणारे आणि जिवंत करणारे त्यांचे हात आहेत. ते म्हणतात की, यंत्रांनाही आत्मा असतो. फक्त त्यांच्याशी आपण माणसासारखं वागलं पाहिजे. ते जुन्यातून सोनं घडवतात. त्यांच्या मते "देव मंदिरात नाही, तो कामात आहे, भक्ती पूजेत नाही, ती कृतीत आहे." खरोखरच त्यांनी आपली कला अगदी मनापासून कृतीत आणली आहे.



Scanned with OKEN Scanner

# SUNIL GANGARAM KAMBALE



खरा विश्वकर्मा – अनामप्रेमचा हिरा

सुनील काका म्हणजे साक्षात “विश्वकर्मा” — हातातले कौशल्य, मनातला भाव आणि समाजासाठी जगण्याची उर्मी. अनामप्रेमला असा सेवाभावी आणि सर्वगुणसंपन्न कलाकार लाभला, म्हणजे जणू एक हिराच सापडला आहे. त्यांच्या हस्तकौशल्याने अनामप्रेम संस्थेचा पाया मजबूत झाला आहे. त्यांच्या सेवाभावाने इथले वातावरण प्रेमाने भारले आहे. त्यांचं कौशल्य म्हणजे एक चालते बोलते विद्यापीठ आहे. त्यांचा स्वभाव म्हणजे साधाभोळा आहे. त्यांचा सेवाभाव म्हणजे मानवतेचा खरा आरसा आहे. अनामप्रेम मधील प्रत्येक खोलीत, प्रत्येक यंत्रात त्यांच्या स्पर्शाचा ठसा उमटलेला आहे. काकांचं आयुष्य केवळ कामाभोवती नाही, तर सेवेभोवती फिरतं. ते दिव्यांगांना मदत करतात, प्राणी पक्षांची काळजी घेतात आणि गरजूंसाठी स्वतःच्या वेळेच भान त्यांना रहात नाही. सुनील काका केवळ मेकॅनिक नाही तर ते माणुसकीचे शिल्पकार आहेत.

प्रेरणा

सुनील काकांची कहाणी शिकवते की –

कष्ट, कला आणि सेवा या तिन्ही गोष्टी एकत्र आल्या की माणूस केवळ यशस्वी नाही, तर सर्वोत्तम बनतो. सुनील काका स्वतःचे आयुष्य स्वतःपेक्षा जास्त इतरांसाठी जगण्यात घालवत आहेत. संपत्तीने नाही सेवा भावाने माणूस श्रीमंत होतो.. हे सुनील काका यांच्याकडे पाहिले असता जाणवते. सुनील काका आज अनामप्रेम संस्थेचा अविभाज्य घटक बनले आहे.

"फुंकर मारुन आपण दिवा विझवू शकतो; अगरबत्ती नाही,
परंतु ज्याचे कर्तुत्व स्वबळावर दरवळत असते, ते कोणी विझवू शकत नाही...!"

या उक्तीप्रमाणे सुनील काका या हरहुन्नरी कलाकाराने त्यांच्या कर्तुत्वाने, त्यांच्या अंगी असणाऱ्या कलेने सामाजिक क्षेत्रामध्ये मानाचा ठसा उमटवलेला आहे.







प्रकल्पातील दुरुस्ती व देखभाल करताना सुनील काका

Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE
# UDYOG BHAVAN

# Anamprem Products



## Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध - त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.



## Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल - त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!









## Anamprem Crocs

अनामप्रेम परिवारातील दिव्यांग बांधवांची सुंदर निर्मिती - क्रॉक्स आता विक्रीसाठी उपलब्ध..!
आपल्या खरेदीतून त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या.
स्वावलंबनाच्या या प्रवासात सहभागी व्हा!



## Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ..!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांग निर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम गोशाळा प्रकल्पास चारा मदतीचे आवाहन

## अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे सध्या 30 गिर जातीच्या गाईंची देखभाल केली जाते. या गोमातेच्या चाऱ्यासाठी संस्थेला मदतीची आवश्यकता आहे.

- सरकी पेंड
- हरभरा चुन
- वालिस (भुसा)
- कॅल्शियम पावडर
- हिरवा चारा

गोशाळेचा दैनंदिन चारा खर्च 1100 रुपये इतका आहे.

आपण एका गाईचे किंवा संपूर्ण गोशाळेचे एका महिन्याचे पालकत्व स्विकारून या पवित्र कार्यात सहभागी होऊ शकता.




**आपला छोटा सहभागही गाईंच्या संगोपनासाठी मोठा हातभार लावेल.**

## ANAMPREM CONTACT & BANK DETAILS

- **Himmat Bhavan Project** - 7350013806 , 9011004576
- **S.J Gram Project** - 7350517778 , 9011670123
- **Marathwada Project.** - 9921509199 , 9011750035
- **Anamprem Pune Hostel.** - 9422307116 , 9011750022

| | |
|---|---|
| बँकेचे नांव Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India |
| शाखा Branch | अहमदनगर (महा) Ahmednagar (MH) |
| खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM

10252110@cbin

हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.

/ANAMPREM

YOU TUBE

INSTAGRAM

FACEBOOK

Scanned with OKEN Scanner